





॥ राष्ट्रदेवाः भवेम ॥

# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र

## ई - प्रशिक्षक

वर्ष २ : अंक ५ / फेब्रुवारी २०१५



Learning of a Teacher



समाजदर्शन उपक्रम










पुस्तक परिचय




शिकू आनंदे

# संपादकीय

सस्नेह नमस्कार,

मध्यंतरी युट्युबवर एक छोटीशी फिल्म पहिली. मुलींच्या आणि विधवांच्या शिक्षणातला एक महान प्रयोग केलेले धोंडो केशव कर्वे या फिल्मचा विषय होते. फिल्म बनवली होती 'प्रभात' चित्रपट कंपनीने. निमित्त होते महर्षी कर्व्यांचा एक्याऐंशीवा वाढदिवस. १९३७ साली चित्रित केलेल्या या फिल्ममध्ये मुलींनी सादर केलेले कला प्रकार, विविध शारीरिक कौशल्ये दाखवली आहेत. तत्कालिन हिंगण्याच्या माळरानावर उभारलेला हा आश्रम मुलींच्या शिक्षणातला एक महत्वाचा टप्पा आहे. त्या फिल्ममध्ये दिसणारे शैक्षणिक उपक्रम आणि आज शाळांमध्ये दिसणारे उपक्रम यात वरवर पाहता फारसा फरक दिसत नाही; परंतु आण्णासाहेब कर्व्यांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची तळमळ आजच्या शिक्षकांकडे आहे का याची शंका वाटते. उपक्रमांचे कार्यक्रमात रुपांतर झाले, स्केलिंग अप झाले की त्यातला मंत्र हारवतो. उपक्रमांचे उत्स्फूर्त आयोजन होत नाही तर ते राबवले जातात. एखाद्या मुख्याध्यापकाच्या उत्स्फूर्तहेतून सुरु झालेला मध्यान्ह भोजनाचा उपक्रम राष्ट्रीय स्तरावर 'राबवला'जातो. तो सगळयांच्याच अनिच्छेचा विषय ठरतो. जेथे त्यातला मंत्र जपला जातो आणि त्याला आधुनिक व्यवस्थापन तंत्राची साथ मिळते तेथे असे कार्यक्रम समाजमनावर परिणाम घडविताना दिसतात. याचे उत्तम उदाहरण 'इस्कॉन' या स्वयंसेवी संस्थेने चालविलेल्या कार्यक्रमात दिसते. इस्कॉनने भारतातीलअनेक शहरांमधल्याशाळांतील मुलांच्या दुपारच्या जेवणाची जबाबदारी घेतली आहे. 'अक्षयपात्र' या नावाने ओळखला जाणारा हा कार्यक्रम पाहण्यासारखा नव्हे अनुभवण्यासारखा आहे. बंगलोरमध्ये सुमारे 3 लक्ष मुलांना सांबार, भात, सॅलड आणि दह्याचे जेवण देण्यासाठी एक विलक्षण यंत्रणा कार्यरत आहे. सेवाभाव आणि आधुनिक औद्योगिक तंत्रज्ञान यांच्या संयोगाने बंगलोर मधल्या लाखो मुलांना रोज गरम गरम जेवण मिळते. महाराष्ट्रात ज्यांना हा प्रयोग पाहयचा आहे त्यांनी तो मीरा रोड, मुंबई किंवा पालघरला जरूर पाहावा. पालघरला सुमारे ५० हजार मुलांना पौष्टिक आणि रुचकर जेवण दररोज देण्याची यंत्रणा अभ्यासण्यासारखी आहे.

शिक्षणात तंत्र आणि मंत्र दोन्ही महत्वाचे आहे. आण्णासाहेब कर्व्यांनी मुलींच्या शिक्षणाचा नुसता मंत्र जपला नाही तर त्याचे शास्त्रशुद्ध तंत्र केले. आजही एस.एन.डी.टी.विद्यापीठाच्या रूपाने ते अस्तित्वात आहे म्हणूनच भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' ही पदवी दिली.

आपणही आपल्या नित्य उपक्रमांत तंत्र आणि मंत्र या दोन्हींचा विचार करू या!

(पुढील दोन लिंक जरूर पाहा )

विवेक पोंक्षे

https://www.youtube.com/watch?v=-k4bIoY4qlg

https://www.youtube.com/watch?v=QWVmdAYbzEA

# Learning of a Teacher

Even as a high school child, I knew that I would want to become a mathematics teacher. I was a lucky student who have got very good teachers. Occasionally, I had taught to different students including my classmates. Right after I finished my masters, I started teaching in an engineering college. But IthinkI did not understand what it means to be a teacher until I went to Arunachal Pradesh to teach mathematics to $10^{th}$ and $12^{th}$ standard students.



When I visited the north east of India (Assam and Arunachal Pradesh) for the first time, I did not have any slightest idea what the stay is going to offer me. The little experience I got about education, socio-economic status, politics and culture of the north east region from the15-days long study tour was just perfect to maintain my interest, increase my curiosity, and create some attachment with the people of that beautiful land. On the return journey of the same tour, I started thinking about the options which can take me back there and being a mathematics teacher the doors were wide open to welcome me. Just 6 months after my first trip, I went back to Arunachal Pradesh for two months to teach mathematics to $10^{th}$ and $12^{th}$ standard children, one month each in Hayuliang and Roing. SevaBharati, Arunachal Pradesh has been conducting free coaching classes since last 5 years. The primary aim of these classes was to revise the syllabus and help students to pass the board's exam as the pass rate in mathematics is noticeably low in Arunachal Pradesh. Along with this I also put some efforts to make mathematics fun and interesting.

Teaching to the tribal children made me think about education from a very different perspective. On one hand I was teaching very simple and basic math concepts to the children,and on the other hand,they were teaching me the important things like love and respect. While teaching elementary techniques such as addition or multiplication of a positive and a negative integer to a student who was about to appear for the $10^{th}$ boards exam in just a couple of months, I went through a series of eye opening questions ranging from very personal to very general questions about our society andeducation system in particular. Almost every otherday I was questioning myself about my decision to come here to teach. I felt if it was really worth spending my time to teach such elementary concepts to tribal students whomay not even pass their board examand who may noteven use this mathematics further in their life? Was I not happy with my previous teaching job which included teaching some fancy game theory, complex geometry or combinatorics to talented high school students who would not only appear for NTSE or Olympiad exams but some of them will even crack those exams? Or was I not satisfied with the salary I was getting as a lecturer in an engineering college for teaching the students who usually struggle even to pass the compulsory mathematics courses? These thoughts had disturbed me for a quite long time and I started thinking deeply about what do we teach, why do we teach and whom do we teach. Do I teach something that is really meaningful for all? Do I teach because I seek pride either in my salary or achievements of my students? Do I want to teach to only bright students or at places where I will get a fat salary?

Such many questions kept haunting me and forced me go to Arunachal Pradesh again this time for four months; two months each in Daporijo and Itanagar. I taught mathematics from $9^{th}$ to $12^{th}$ standard and some topics from science upon students' requests. The very first class would usually start at 6 in the morning with teaching at one or two different schools before the school starts and another one or two different schools after the school hours. I visited many schools in the daytime and conducted various small activities for children of different age groups and mostly went to my students' houses for dinner. I was experiencing the unconditional love from the students and their parents, the high sense of civilization in the tribal communities, the beautiful but unpredictable nature, and the continuous dialogue on various questions in my mind. All this gave me a great opportunity to think, to understand and to experience the role of a teacher. The very first thing I learned that even if I was teaching some basic mathematics,I was not really teaching anything. Secondly, if I really want to teach something, I need to make sure while completing the syllabus and preparing my students for the exam, whether I'm creating any opportunity for them to learn something that is meaningful. Third, the very short duration of my stay of about a month made things even more difficult. It was a challenge to put a lot more efforts to unlearn the wrong notions and teach the correct concepts.



My mind was slowly getting trained and occupied in searching for activities and tasks from which the students will learn something that is useful for them in the long run. Some simple games helped me to engage them in using their prior understanding and experiences to build the new concepts. One game I conducted was to reinforce the concept of place value and how to read and write big numbers. Even the $10^{th}$ standard students played this game for a very long time and seem to enjoy it a lot. I would make groups of 10 students and assign some digit from 0 to 9 to each student. Then I would tell some number in words and each group would write that number using the students as symbols instead of the digits. The group that first shows the number correctly will get the points. For the numbers without repetition of the digits, the game was very simple. For the numbers with repetition of the digits, for example: 1123 can be represented as (1)(0)(4+8)(3) or (1)(0)(5+7)(3) or (4+7)(2)(3) or (5+6)(2)(3). These different expressions reinforced the concept of place value. That is 1123 is 1Th 1H 2T 3U and also 1Th 0H 12T 3U and so on. I modified this activity depending upon the number of students and their level of familiarity with big numbers. For example, the number of students in each group can be more than 10, say 16. In this case the students will be assigned values from 0 to 15 where the above number can also be written as (1)(0)(12)(3) or (11)(2)(3). After getting one correct solution, I would give some more time to find other possible representations of the same number and if possible exactly how many ways to represent the same number (this is possible when the numbers are small and easy).

I believe such activities havethe potential to achieve many things, from learning actual concept to interconnecting different concepts to understanding group dynamism. I experienced the genuine need of such activities while teaching in Arunachal Pradesh. The whole concept of how I can teach better was transformed into how students can learn better. I would certainly recommend every teacher to take up a similar teaching experience.It would be more of a learning experience, which in turn helps to understand about student centric learning. Even if one does not get such an opportunity,every teacher must ensure track their learning in order to create meaningful learning for all students.

**Sneha Bhansali**
bhansali.sneha07@gmail.com

Graduate Research Assistant
The University of Lowa USA

# संख्या बनवा

**उद्देश** : संख्येची संकल्पना व प्रत्येक स्थानाची किंमत कळणे, अंकांशी व संख्येच्या किंमतीशी जवळीक वाढणे.

**साहित्य** : 0 ते 9 अंक लिहिलेली मोठी कार्डे, 2 संच व बांधण्यासाठी आवश्यक ते साहित्य, दोरी इ.

**वेळ** : 25 ते 30 मि.पूर्वतयारी : 5 मि. प्रत्यक्ष खेळ : 20 मि.चर्चा : 5 मि.

**प्रशिक्षकासाठी** : या खेळात 20 च मुलांना प्रत्यक्ष सहभागी होता येते. त्यामुळे त्यापेक्षा अधिक मुले असल्यास त्यांना निवेदक, परीक्षक, नोंदी ठेवणारा या नात्याने सहभागी करून घ्यावे.

**पद्धती** : उत्साहाने पुढे येणाऱ्या 20 मुलांना दोन रांगांमध्ये उभे करावे. दोन रांगांच्या मध्ये साधारण 8 ते 10 फुटांचे अंतर असावे व मधे रेष आखावी. 0 ते 9 असे आकडे प्रत्येक रांगेत डावीकडून-उजवीकडे म्हणण्यास सांगावे. त्यानंतर पुढील सूचना द्याव्यात. सूचनेतील संख्या प्रथम लिहून ठेवल्यास अधिक चांगले.

**सूचना** : प्रत्येक रांगेत पुन्हा आपण अंक मोजू या. (0 ते 9 असे मोजून झाल्यावर) प्रत्येकाने आपला अंक लक्षात ठेवावा. मी जो अंक मोठ्यांदा म्हणेन त्या अंकाने, म्हणजे त्या मुलाने पुढे यावयाचे, ज्या गटातील व्यक्ती प्रथम या मधल्या रेषेपर्यंत येईल, त्या गटाला गुण मिळेल. सुरू.

(प्रथम 1 अंकी आकडे सांगावेत. असे दोन तीन आकडे झाल्यावर दोन अंकी आकडे सांगावेत.)

मी आता दोन अंकी आकडे सांगणार आहे. त्यासाठी दोन मुलांना पुढे यावे लागेल. उदा. '27' असे म्हटल्यानंतर 2 व 7 ने पुढे यावयाचे आणि असे उभे राहायचे की तुमच्या समोर विरुद्ध बाजूला असलेल्यांना तो आकडा '27' असाच दिसायला हवा. आपण एकदा करून पाहू. '38' मुले पुढे येतील. एखाद्या अकं-मुलाचे भान नसेल. प्रत्येक गटातील दोन दोन मुले पुढे आल्यावर विरुद्ध बाजूने ती संख्या दिसते की नाही हे पाहावे व स्पष्ट करावे.

एक-दोन वेळा केल्यावर पुढचे आकडे मुलांना येतात. सहभागी मुलांच्या अथवा प्रौढांच्या क्षमतेनुसार संख्या मोठ्या घ्याव्यात. 6-7 अंकीही चालतात. खेळ संपल्यावर चूक कशाकशामुळे होते ते विचारावे. न चुकणाऱ्या मुलांच्या युक्त्या विचाराव्यात.

**अधिक** : आपला क्रमांक विसरणारी, लक्ष नसणारी मुले, भांबावलेली मुले कळून येतात. त्यांना मदत करावी लागेल. दुसऱ्या बाजूने संख्या दिसण्यासाठी दुसऱ्याच्या भूमिकेतून बघावे लागते हे जाणवून द्यावे.


**नोंदी** : प्रत्येक गटाला मिळणारे गुण जाहीर करणे. साधारणतः 10 ते 15 संख्या करायला सांगाव्यात.


*******


('हसत खेळत बुद्धिविकास'मधून साभार)


# पुस्तक परिचय


एकोणिसावे शतक आणि विसाव्या शतकातील राजकारण समजून घेण्यासाठीची महत्त्वाची घटना म्हणजे दुसरे महायुद्ध. जागतिक इतिहासाचा अभ्यास करताना महायुद्धातील घटना , व्यक्ती - चरित्रे, अणुयुद्धाची नांदी अशा अनेक आयामांवर इतिहास, राज्यशास्त्र, विज्ञान शिक्षकांना या कालखंडाचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त संदर्भ :





For more details visit :
http://www.bookganga.com



सामाजिक जाणीव विकसनासाठी घेतल्या जाणाऱ्या समाजदर्शन उपक्रमांतर्गत सोलापूर शहरातील बहुभाषिक समाजाची ओळख या उद्देशाने या वर्षी हा उपक्रम राबविला गेला.

समाजात घडणाऱ्या घटनांची व सामाजिक स्थितीची जाणीव व्हावी, समाजातील विविध प्रश्नांची अथवा समस्यांची ओळख व्हावी, लोकजीवनाची माहिती व्हावी, त्यायोगे त्यांचे आपल्या जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे या हेतूने सोलापूर ज्ञान प्रबोधिनीमध्ये हा उपक्रम योजला गेला.

सोलापूर दोन राज्याच्या सीमेवर असल्याने इथे विविध भाषिक लोक काही ना काही कारणाने स्थायिक झाले आहेत. या उपक्रमाच्या स्वरूपाचा विचार करता शाळेच्या चार भिंती बाहेर जाऊन विविध सामाजिक घटकांपर्यंत पोहोचून सद्यस्थितीची जाणीव निर्माण करणे व त्यानुसार सोलापूर शहरातील बहुभाषिक कुंटुंबांपर्यंत पोहोचून त्यांच्या भाषेविषयी संस्कृती, सण-वार, खाद्य पदार्थ, पोषाख, साहित्य इ. विषयी जाणून घेण्याचे ठरले.

विद्यार्थ्यांनी बहुभाषिक कुंटुंबाची ओळख करून घ्यायची म्हणजे नेमके काय करायचे ? याचा विचार झाला आणि मग चर्चेअंती मुलाखतीतून, प्रश्नावलीच्या मदतीने ओळख करून घ्यावी असे ठरले. त्याप्रमाणे आवश्यक प्रश्न योजना करून, प्रश्नावली अनेकांच्या मार्गदर्शनाने अंतिम करून घेतली. विद्यार्थीगट तयार करताना इ.५वी ते १०वी तील प्रत्येकी एक विद्यार्थी असा ६ जणांचा एक याप्रमाणे ८७ गट तयार झाले. इ.९वी व १०वी चे विद्यार्थी गटप्रमुख म्हणून काम पाहतील असे ठरले व सर्व शिक्षक, छात्राध्यापिका, कर्मचारी सदस्य, युवक, पालक हे गट मार्गदर्शक असतील असे ठरले.


या उपक्रमाची पूर्वतयारी करताना आषाढी एकादशीचे औचित्त्य साधून विविध भाषिक भजनी मंडळांनी भजन सादर केले, निरूपण केले. गुरुपौर्णिमेनिमित्त विविध भाषिक शिक्षकांना बोलावून त्या त्या भाषेची संस्कृती व महत्त्व समजून घेण्याचा वर्गश: प्रयत्न झाला.

प्रशालेत असणाऱ्या विविध नऊ भाषा बोलणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक तसेच इतर भाषिक गटाच्या प्रमुखांना, जाणकारांना भेटल्यावर सोलापुरातील बहुभाषिक समाजाची कल्पना येऊ लागली.

कुंटुंबामध्ये जाऊन त्यांच्याशी गप्पा मारत, मुलाखतीतून माहिती जाणून घ्यायची होती पण ही मुलाखत घ्यावी कशी ? आपल्याजवळचे प्रश्न विचारावे कसे याकरिता विद्यार्थ्यांना नमुना मुलाखत घेऊन दाखवली. आपल्या पालकांपैकी एका कन्नड भाषिक कुंटुंबाला मुलाखतीसाठी आमंत्रित केले व एका गटाने मुलाखत घेतली.

भाषा जाणून घेणं किंवा संस्कृतीची ओळख करून घेणं म्हणजे नक्की काय ? आणि कशासाठी ? हे स्पष्ट व्हावं म्हणून भाषा अभ्यासकांचे व्याख्यान झाले.

या वर्षी प्रशालेतील ५०८ विद्यार्थ्यांनी म्हणजेच ८७ गटांनी १०० मार्गदर्शकांसह १६ भाषा बोलणाऱ्या शहरातील ३८७ कुटुंबांपर्यंत पोहोचून त्यांची संस्कृती जाणून घेतली.




विद्यार्थ्यांनी बहुभाषिक कुटुंबांतून आणलेल्या माहितीचे, प्रश्नावलीचे सर्वेक्षण करून त्यानुसार आलेख, चित्रतक्ते, माहिती, लेख, पीपीटी इ. तयार केली व त्याचे प्रदर्शन भरवले.

**समाजदर्शन**
**उपक्रम २०१४**

| अ.क्र. | भाषा | भेटी दिलेले कुटुंबे | | | | मातृभाषा वापर होय/नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कुटुंबे | स्त्री | पुरुष | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | कैकाडी | २४ | ५२ | ६६ | ११८ | ७५/२४ |
| २ | क्षत्रिय | ४४ | १०६ | १३२ | २३८ | २३८/० |
| ३ | मारवाडी | ३७ | ११६ | १२० | २३६ | २२०/१६ |
| ४ | पंजाबी | ७ | १८ | २२ | ४० | ३७/3 |
| ५ | गुजराती | ४३ | ७५ | १०३ | १७८ | १७५/3 |
| ६ | मल्याळी | ९ | १७ | १५ | ३२ | ३२/० |
| ७ | सिंधी | १३ | ३८ | ४१ | ७९ | ४९/३० |
| ८ | तेलगु | ५६ | १५९ | १७४ | ३३३ | ३३०/3 |
| ९ | लमाण | ७ | २० | १६ | ३६ | ३३/२ |
| १० | हिंदी राजपूत | १२ | २४ | २८ | ५२ | ५२/० |
| ११ | उर्दू | ६ | २० | १७ | ३७ | ३७/० |
| १२ | कन्नड | ६७ | १२२ | १४६ | २६८ | २६०/२७ |
| १३ | पारशी | ७ | १२ | ११ | २३ | २३/० |
| १४ | तिबेटी | ५ | १२ | ७ | १९ | १९ |
| | | | | | | |
| | एकूण | ३३७ | ७९१ | ८९८ | १६८९ | |

कुटुंबांनी केलेले स्वागत, सहकार्य यातून निर्माण झालेल्या आपुलकीतून त्यांनाही आपल्या शाळेत बोलवावे असे वाटू लागले व यातून १२ डिसेंबर २०१४ रोजी या कुटुंबांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला. आलेल्या सदस्यांनी आपापल्या भाषेची तयार केलेली माहिती प्रदर्शनात आवडीने पाहिली व आनंद व्यक्त केला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी काय मिळवले याचा विचार करताना गट-चर्चा, मनोगते यातून असे लक्षात आले की विद्यार्थ्यांमध्ये अशा प्रकारची सामाजिक जाणीव निर्माण होते आहे. पदार्थ, रीती यात वैविध्य असले तरी संस्कृतीत साम्य जाणवते. परप्रांतीय बहुभाषिक स्थानिक संस्कृतीत समरस झाल्याचे जाणवते. अन्य भाषिकांचे समाजातील योगदान समजले. भाषा व संस्कृतीचा परिचय झाला. अन्य भाषेबद्दल वाटणाऱ्या उत्सुकतेचे काहीसे निवारण झाले. भाषा, प्रांत वेगवेगळे असले तरी सण-वार, खाद्यपदार्थ यात साम्य जाणवले. शहरातील एकूण संख्येत बहुभाषिकांचे प्रमाण लक्षात आले. बहुभाषिकांची सोलापुरात येण्यामागची कारणे लक्षात आली.

सामाजिक जाणीव विकसनासाठी विद्यार्थीदशेत अशा उपक्रमातून मिळालेल्या या अनुभवांचा विद्यार्थीघडणीत मोठा वाटा असेल.

**सौ.प्रवीणा जोशी,**

**सहशिक्षिका, बाल विकास मंदिर प्रशाला, सोलापूर**








वाचण्यासाठी येथे क्लिक करा -
http://www.erc-pune.org/en/resources/shiku-anande

**Website Links**

http://www.deccancollegepune.ac.in/

http://www.ihcn.in/

http://nationalarchives.nic.in/

http://www.indianhistorycongress.org.in/

http://www.royalasiaticsociety.org/site/

http://www.rbi.org.in/currency/museum/c-medi.html

http://sanskritdocuments.org/scannedbooks/asiallpdfs.html

http://www.youtube.com/watch?v=j1p2F9n2tUo&feature=youtu.be

http://www.hinduismtoday.com/modules/wfchannel/index.php?wfc_cid=20

http://www.tspasibhopal.nic.in/kalash.html

http://silentpagesindia.blogspot.in/


# ज्ञान प्रबोधिनी

## शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

दूरभाष : २४२०७१९३, २४२०७१९४

ई - मेल : erc@jnanaprabodhini.org

Visit us at : **www.erc-pune.org**